# मुकुल माधव फाउंडेशनतर्फे लहान मुलांवर हृदय शस्त्रक्रिया

पुणे, दि. १३ (प्रतिनिधी) - फिनोलेक्स इंडस्ट्रिजचे सीएसआर पार्टनर मुकुल माधव फाउंडेशन, रूबी हॉल क्लिनिक व हिलिंग लिटल हार्टस्च्या वतीने चार महिने ते वीस वर्षे वयोगटांतील २२ लहान मुलांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या. दरवर्षी तीन महिन्यांतून एकदा यूकेवरून सहा विशेष तज्ज्ञांचे पथक रूबी हॉलमधील मुलांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात येते. रूबी हॉल क्लिनिकद्वारे अशा मुलांची छाननी करण्यास व शस्त्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास मदत करण्यात येते. आतापर्यंत ६८ मुलांवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया म्हणाल्या की, अशा मुलांना निरोगी आयुष्याची पुन्हा एकदा संधी देण्यासाठी हिलिंग लिटल हार्टसच्या माध्यमातून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. डॉ. संजीव निचान म्हणाले, लहान मुलांवर शस्त्रक्रिया करणे हे खरोखरच आव्हानात्मक कार्य आहे. हे कार्य निर्विघ्नपणे पार पडल्यावर त्यातून मिळणाऱ्या यशाचा आनंद खूप मोठा असतो.